नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०७/२०२५ (मंगळवार)**

---

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुचा साठा करून विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०२ गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक १४/०७/२०२५ रोजी पोलीस स्टेशन रामटेक येथे अन्न व औषध प्रसाशन चे अधिकारी यांनी महीती दिली की, नासरे किरणा जनरल स्टोअर किल्ला रोड, नगरधन,रामटेक आणि अभिलाष किरणा जनरल स्टोअर किल्ला रोड, नगरधन, रामटेक येथे महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुगंधीत तंबाखु साठवुन विक्री केली जाते. रामटेक पोलीसांनी अन्न व औषध प्रसाशन चे अधिकारी यांच्यासह नमुद घटनास्थळी जावुन कारवाई केली नमुद प्रकरणी अन्न व औषध प्रसाशन चे अधिकारी यांचे रिपोर्ट वरून खालील प्रमाणे दोन गुन्हे नोंद आहे.

**अप क्र ५१४/२०२५** आरोपी क्रं १) नामे शंकर रामाजी नासरे आणि क्रमांक २) अक्षय शंकर नासरे दोन्ही रा. घर क्रमांक २०२८ किल्ला रोड, नगरधन,रामटेक यांच्या नासरे किरणा जनरल स्टोअर मधुन सुगंधित तंबाखू ९५.१३४ किलोग्रॅम किमती ६७,६७२/— रूपये तसेच पान मसाला ४२.७३६ किलोग्रॅम किमती ६१,७४६ /— रूपये एकूण १०७.८७ किलोग्रॅम असा एकूण किंमती १,२९,४१८/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**अप क्र ५१५/२०२५** आरोपी नामे अभिलाष राधेश्याम वाघमारे, रा वार्ड क्रं ५, नगरधन,रामटेक यांच्या अभिलाष किरणा जनरल स्टोअर मधुन पान मसाला ३३.३७५ किलोग्रॅम किमती ४६,२०० /— रूपये, शिविंग टोबॅको १.५० किलोग्रॅम किमती ११२५/— रुपये आणि प्रतिबंधित सुगंधित तंबाखू ३७.०५ किलोग्रॅम एकूण किमती ५०,८३० /— रूपये एकूण मुद्देमाल ७७.

६७५ किलोग्रॅम एकूण किंमती रक्कम ९८,१५५/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**दोन्ही कारवाई मध्ये एकुण १८५.५४५ किलोग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती २,२७,५७३ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे रामटेक येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ आणि कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

## अवैधरित्या विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांवर २ गुन्हे नोंद
## २ चारचाकी वाहनासह एकुण ७ लाख ३१ हजार २८० रूपयांचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन बेला** :— दिनांक १४/०७/२०२५ रोजी ते १५.०७.२०२५ रोजी मध्यरात्री दरम्यान श्री. दिपक अग्रवाल, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी नागपुर विभाग, नागपुर यांनी जिल्हा गस्त दरम्यान आणि सहा.पोलीस निरीक्षक श्री. सी.बी. चौहाण, प्रभारी अधिकारी बेला यांनी विभागीय गस्त दरम्यान मौजा चिमनाझरी शिवारातुन तेलगांना राज्यात काही इसम अवैध्यरित्या दारू ची तस्करी करीत आहे अशा खबरे वरून सापळा रचुन खालील प्रमाणे कारवाई करून दोन गुन्हे नोंद केले आहे.

**कारवाई क्रं १:—** नागपुर ते चंद्रपुर रोडवरील रामदेव बाबा धाबा येथे आरोपी क्रं १) रमना साबया करवेद, वय ४७ वर्षे, रा. घर क्रं ०७/१३१ — २ आत्मकुर जि. वरंगल राज्य तेलंगना आणि आरोपी क्रं २) रणधीर कोरमा रेड्डी , वय ४५ वर्षे, रा. घर क्रं ०१/३७ रघुनाथपल्ली, ता. जफरगड, जि. जलगम, राज्य तेलंगना यांचे कार क्र. एच आर २६ डी ई ७६११ मध्ये विदेश दारू मिळुन आल्याने नमुद आरोपीतांच्या ताब्यातुन पंचासमक्ष कार क्र. एच आर २६ डी ई ७६११ किंमती ४,००,०००/— रूपये आणि ०१) विदेशी दारु जॉनीवाकर रेड लेबल व्हिस्की ०२) विदेशी दारु रॉयल स्टॉग व्हिस्की किंमती ८३,५२०/— रूपये असा एकुण ४,८३,५२०/— रूपयेचा माल जप्त करण्यात आला आहे.नमुद आरोपीतांवर पो.स्टे. बेला येथे अपराध क्रमांक २५१/२५ कलम ६५ (अ) (ई) मदाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**कारवाई क्रं २ :—** नागपुर ते चंद्रपुर रोडवरील रामदेव बाबा धाबा येथे आरोपी क्रं १) करनाकर गोपाल बुरा, वय ३८ वर्षे, रा घर क्रं ०१/०७ बसस्टॉप च्या मागे गुन्नीपारती जि. हनमकोंडा,

राज्य तेलंगना  आणि आरोपी क्रं २) राजरेडी रामरेडी रायडी, वय ४५ वर्षे, रा. घर क्रं ०२/८३ कन्टामकुर, ता.परकाल जि. हनमकोंडा, राज्य तेलंगना   यांचे कार क्र.एच आर ५१ बी ई ५५६७ मध्ये विदेशी दारू मिळुन आल्याने नमुद आरोपीतांच्या ताब्यातुन पंचासमक्ष कार क्र.एच आर ५१ बी ई ५५६७ किंमती २,००,०००/— रूपये   आणि ०१) विदेशी दारु जॉनीवाकर रेड लेबल व्हिस्की ०२) विदेशी दारु रॉयल  स्टॉग व्हिस्की किंमती ४७,७६०/— रूपये असा एकुण २,४७७६० रूपयेचा माल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांवर पो.स्टे. बेला येथे अपराध क्रंमाक २५२/२५ कलम ६५ (अ) (ई) मदाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे

वरील कारवाईत  एकुण ७,३१,२८०/— रूपयेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वर नमुद चारही आरोपीतांर



# नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६७० रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १५/०७/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६७० आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३१ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण ९५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे २९ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २४ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २० आरोपी अशा एकुण १०२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ४३ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी अशा एकुण १३४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापरखेडा येथे ३४ आरोपी अशा एकुण ९७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे २९ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे २५ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे ३३ आरोपी अशा एकुण ११३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३२ आरोपी अशा एकुण १२९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन एकुण ६७० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**




पोलीस स्टेशन
WIRES & CABLES





# रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने , अवैध्यरित्या विदेशी दारू ची वाहतुक करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

दिनांक १४/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १५/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री दिपक अगवाल, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत जुनी वस्ती येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि एम. आय.डी.सी. चौक येथे नाकाबंदी केली. पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी बोरी अंतर्गत गंगापुर झोपडपट्टी येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि गार्डन चौक येथे नाकाबंदी केली. सदर कोबिंग ऑपरेशन श्री दिपक अग्रवाल यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन चे अधिकारी/अंमलदार हजर होते.

**पोलीस स्टेशन बेला येथे रात्रगस्त दरम्यान अवैध्यरित्या विदेशी दारू ची तस्करी करणाऱ्यांवर  कलम ६५ (अ)(ई) मदाका अन्वये २ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**







मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने